॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
आज़ादी का अमृत महोत्सव
Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572
ACADEMIC (AFFILIATION) SECTION
Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

# परिपत्रक

विषय : सर्व संलग्नीत महाविद्यालयांची ऑनलाईन तपासणी (शैक्षणिक व प्रशासकिय अंकेक्षण) अंतिम मुदत वाढ बाबत.

संदर्भ: १) या विभागाचे दि. १३/११/२०२५ रोजीचे परिपत्रक
२) या विभागाचे दि. २९/११/२०२५ रोजीचे परिपत्रक
३) या विभागाचे दि. २७/१२/२०२५ रोजीचे परिपत्रक

वरील विषयी व संदर्भीय परिपत्रकान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांची महाराष्ट्र अधिनियम २०१६ कलम ११७ नुसार ऑनलाईन तपासणी (शैक्षणिक व प्रशासकिय अंकेक्षण) करिता माहिती सादर करण्याची मुदत दि. १०/०१/२०२६ पर्यंत वाढवून देण्यात आलेली होती. परंतु अनेक महाविद्यालयांनी मुदतवाढीसाठी केलेल्या विनंती नुसार मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने ही मुदत **दि. २०/०१/२०२६** पर्यंत वाढविण्यात येत आहे.

सबब, सर्व संलग्नीत पारंपारिक महाविद्यालयांनी (कला, वाणिज्य, विज्ञान) मुदत वाढीची नोंद घेवुन सदर माहिती ऑनलाईन https://srtmun-uims.org/affiliated-college/college-login या लिंकव्दारे **दि. २०/०१/२०२६** पर्यंत सादर करावी. त्याची एक प्रत सर्व पुरक कागदपत्रासह खास दुतामार्फत दि. २४/०१/२०२६ रोजी संलग्निकरण विभागास सादर करावी. असे कळविण्यात आलेले होते.

**तथापि, याबाबत आपणास पुनश्च: कळविण्यात येते की दि २०/०१/२०२६ पर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ ही अतिंम असुन यापुढे यासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही.**

तसेच आपणास हेही कळविण्यात येते की संलग्नित महाविद्यालयांच्या ऑनलाईन तपासणी (शैक्षणिक व प्रशासकिय अंकेक्षण) करिता ऑनलाईन लिंकद्वारे पुर्ण माहिती भरण्यात यावी व पुरक कागदपत्रेही अपलोड करण्यात यावीत तसेच ऑनलाईन लिंकद्वारे भरलेल्या माहितीची प्रिंट काढुन त्यासोबत प्राचार्यांच्या स्वाक्षरीने (कव्हरींग लेटरसह) **केवळ खालील दिलेल्या कागदपत्रासह उपकुलसचिव संलग्नीकरण विभाग यांचेकडे दि. २४/०१/२०२६ पर्यत सादर करावेत.**

१) महाविद्यालयाच्या जागेचे /इमारतीचे मालकी किंवा भाडयाने असल्याबाबतची पुरावे/कागदपत्र सादर करावी.
२) महाविद्यालयात कार्यरत प्राचार्य व त्यांना असलेले विद्यापीठ मान्यता पत्र सादर करावे.
३) महाविद्यालयात (पदवी/पदव्युत्तर) अभ्यासक्रमनिहाय कार्यरत प्राध्यापकांचे नावे व त्यांना विद्यापीठ मान्यता पत्राचा क्रमांक नमुद करून यादी सादर करावी.
४) महाविद्यालयात कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचा—यांची यादी.
५) महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन/पुर्नमुल्याकंन बाबत माहिती सादर करावी.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड—४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न—०३/२०२५—२०२६/९८६
दिनांक :— १२/०१/२०२६

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

**प्रत माहितीस्तव:**
०१. मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
०२. मा. प्र. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
०३. मा. प्र. अधिष्ठाता, आंतर विद्याशाखीय विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :—**
१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट,शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.